# ❖ साईबाबा भक्तनिवासस्थान ❖



# Nit Document

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणे या कामाची ई - निविदा.

सन २०२३-२०२४

( एक वर्षाकरीता )

दि.०१ /०५/२०२३ ते दि. ३०/०४ /२०२४

Scanned with Oken Scanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी साईबाबा भक्तनिवासस्थान

# ❖ ई- निविदेच्या अटी शर्ती ❖

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमधील खोल्या व हॉल (भुभाग,छत,भिंती) त्यातील फर्निचर, संडास,स्नानगृह,गाद्या,कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकूण, झुरळे व इतर किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन किटकनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेकामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत यासंबंधीच्या सुचना, अटी/शर्ती खालीलप्रमाणे

१) पेस्ट कंट्रोल कामी ई- निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२) पुर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

अ) निविदाधारकाने निविदा फी रु.३२००/- ( अक्षरी रुपये – तीन हजार दोनशे मात्र) व बयाणा रक्कम रु. १६,०००/- ( अक्षरी रुपये सोळा हजार मात्र ) शासनाचे www.mahatenders .gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन जमा करावी.

**ब) ई- निविदे सोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाचीआहेत. Hard Copy मध्ये कागदपत्र सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

३) वाणिज्यिक बीड (Commercial Bid ) उघडणे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी याबाबत साईबाबा भक्तनिवासस्थान, कार्यालयात संपर्क करुन माहिती घ्यावी.

४) अपुर्ण ई- निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५) ई-निविदा फी व बयाणा रक्कम ऑन लाईन जमा केल्या शिवाय सादर केलेले बीड ऑफ कोटेशन (BOQ)चे Document उघडले जाणार नाही.

६) ज्यांची ई-निविदा मान्य होईल त्या निविदाधारकास निविदा स्विकृती पत्र मिळालेपासुन ८ दिवसात करारनामा करुन द्यावा लागेल व कामाची हमी म्हणुन कार्यादेशाच्या मंजुर रकमेवर ३ % प्रमाणे होणारी रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणुन बिनव्याजी ठेवावी लागेल. सदरची रक्कम कामाची वर्क ऑर्डर मिळाले नंतर आठ दिवसाचे आत संस्थानकडे जमा करणे बंधनकारक राहील.

७) औषध फवारणी केलेनंतर औषधाचा प्रभाव ६० दिवस असणे आवश्यक आहे.

८) औषध फवारणी करतांना औषधांचा प्रभाव ढेकून, झुरळे, पाल, पिसा,मुंगी, व इतर किटकांवर होणे आवश्यक आहे.

९) निविदाधारकाची मागील तीन वर्षाची (२०१९/२०२०, २०२०/२०२१, व २०२१/२०२२) सरासरी वार्षीक उलाढाल किमान रुपये ५०,००,०००/- ( अक्षरी-पन्नास लाख रुपये ) असणे बंधनकारक आहे.

१०) कमी जास्त दराची कोणतीही ई निविदा स्वीकारण्याचा - नाकारण्याचा, अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

११) निविदाधारकास खालील निवासस्थानांमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करावयाचे आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हॉल मिळुण एकूण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५२६ | ११ | १९८ | १,७३,२६८.०० |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | ०१) समर्पण | ०२ | -- | -- | ४९०.०० |
| | | ०२) साईनाथ छाया | -- | ०२ | -- | ४४८.०० |
| | | ०३) साईनिवास अतिथीगृह | २४ | -- | -- | १४,२२४.५० |
| | | ०४) साईउद्यान | ३३ | १२ | ९९ | २३,३१४.०० |
| | | ०५) शांतिनिकेतन | १५ | -- | -- | २,५६८.७२ |
| | | ०६) सेवाधाम | ६० | -- | -- | ५,५०८.८९ |
| | | ०७) साई सेवा बसस्थानक | १४ | १४ | -- | १५,३९७.०२ |
| | | ०८) संस्थान स्पर्धा परिक्षा केंद्र व अतिथीगृह | ६४ | -- | -- | २०,६६२.५३ |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती निवासस्थान | ३३० | -- | -- | २,०५,११७.०० |
| | | एकुण - | १,०६८ | ३९ | २९७ | ४,६०,९९८.६६ |

१२) पेस्ट कंट्रोल करण्याचा कालावधी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या तिनही निवासस्थानांमध्ये एक वर्षाचा राहील. ( दि ०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४ /२०२४ )

१३) टेक्नीकल बीडचे प्रत्येक पानावर ई-निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

१४) निविदाधारकाने बीड ऑफ कोटेशन (BOQ) सादर करतांना सर्व कर वगळुन अंतिम दर देणे बंधनकारक आहे.

१५) निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम केले नाही त्यामुळे इतराकंडुन करुन घेण्यात आलेल्या कामापोटी संस्थानचे झालेले नुकसान निविदाधारकास द्यावे लागेल. त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाला रु.५००/- प्रमाणे वाढीव नुकसान (Penalty) संस्थानला द्यावयाचे आहे. दंडाची रक्कम निविदाधारकाच्या बीलातुन परस्पर कपात करण्यात येईल.



Scanned with Oken Scanner

१६) निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम करत नसेल तर अथवा पेस्ट कंट्रोलचा काहीच परीणाम होत नाही असे आढळुन आल्यास, संस्थान कोणतीही पुर्व सुचना न देता करार रद्द करेल व निविदाधारक यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात **येवून ०३ वर्षासाठी** संस्थानच्या काळया यादीत नाव टाकण्यात येईल.

१७) न्युनतम दरानुसार मंजुर झालेल्या कामाबाबतचा कार्यदेश देण्यात येईल,त्यानुसार काम करावे लागेल.दिलेले काम वेळेत न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१८) ई-निविदेमधील अटी-शर्तीचा व देण्यात येणा-या कागदपत्रांचा अभ्यास करुन निविदा सादर करावी, निविदे संबंधी काही शंका असेल तर त्याची साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, साईबाबा भक्तनिवासस्थान शिर्डीचे कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक – (०२४२३) २५९११५० व ऑनलाईन बाबत शंका असेलतर **सीसीटीव्ही ई –निविदा कक्ष** दुरध्वनी क्र. (०२४२३) २५८९३३ यांच्याशी संपर्क करावा.

१९) निविदाधारकांने टेक्नीकल व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई-निविदा सादर करतांना काही माहिती अपुरी ठेवल्यास/राहिल्यास त्या ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील, अंतिम निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी राखीव असेल.

२०) नमुद केलेल्या इमारतीमध्ये एक वर्ष कालावधीकरीता पेस्ट कंट्रोल करणे आहे. पेस्ट कंट्रोल व्यवस्थीत झाले नाही असे आढळुन आल्यास निविदाधारकास स्वखर्चाने पुनश्च तक्रार निवारण होईपर्यत फवारणी करुन दयावी लागेल. त्यासाठी वेगळी रक्कम अदा केली जाणार नाही.

२१) निविदाधारकास पेस्ट कंट्रोल करण्यापुर्वी संबंधीत विभागाकडुन कळविण्यात येईल, त्यानुसार खोल्या, हॉलमध्ये औषध फवारणी करुन द्यावी लागेल.

२२) औषध फवारणीसाठी लागणारे कामगार, औषध,पंप, साहित्य वगैरे निविदाधारकाने स्वखर्चाने पुरवावयाचे आहेत.

२३) **खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावेत.**

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील | जोडले असल्यास ✓ मार्क करावे |
|---|---|---|
| १ | बयाना रक्कम रु.१६,००० /- शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती | |
| २ | ई – निविदा फी रु.३,२००/- शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती | |
| ३ | आय.एस.ओ. (I.S.O.) मानांकन प्रमाणपत्र | |
| ४ | Licensing Authority चे प्रमाणपत्र | |
| ५ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला | |
| ६ | पॅन कार्ड | |
| ७ | प्रॉव्हिडंड फंड स्वतंत्र कोड नंबर ( कोड ड्रॉप्ट लेटर ) | |
| ८ | GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑन लाईन GST क्रमाक पावती | |
| ९ | शासकीय/निमशासकीय / पंचतारांकित हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेश. | |
| १० | पेस्ट कंट्रोल कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा व त्यासंदर्भातील आवश्यक पुरावे. | |
| ११ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटर ट्रेनिंगचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>१) Central Food Technological Resarch Institute अथवा<br>२) Technical Training For PMPs अथवा<br>३) Storage Pest Management & Fumigation ( भारतीय अनाज संचयन संस्थान चे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र ) अथवा The Pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र<br>◈ निविदाधारकाने स्वयंघोषित ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र केलेले असल्यास ते ग्राहय धरले जाणार नाही. | |
| १२ | सन २०१९-२०२०, २०२०-२०२१, व २०२१-२०२२ तीन आर्थिक वर्षाचे सरासरी वार्षीक उलाढालीचे चार्टड अकाऊंटंट यांचेकडील प्रमाणपत्र. | |
| १३ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले / असले बाबतचे हमीपत्र लेडर हेडवर सही शिक्यानिशी सादर करावे ( Self Declaration ) | |

२४)पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे जाणे/येण्याचा खर्च तसेच चहा/पाणी/जेवण/नाष्टा/राहण्याची वगैरे खर्चाही निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.

२५)पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची विषबाधा अगर इतर कारणास्तव काही त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. संस्थानवर कुठल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

२६)अ) पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे वेतन / भविष्य निर्वाहनिधी / व्यवसायकर/ आयकर/ सेवाकर व ऐनवेळी उद्रभवणा-या इतर सर्व कायदेशीर बाबींची जबाबदारी निविदाधारकावर राहिल. त्यास कोणत्याही प्रकारे संस्थान जबाबदार राहणार नाही.

ब) निविदाधारकाची निविदा मंजूर झालेनंतर त्यांनी सदर कामासाठी घेतलेल्या कामगारांचे भविष्य निर्वाह निधी अंशदान, कामगार कल्याण निधी, इ.एस.आय.सी. कॉन्ट्रीब्युशन , ग्रुप इन्सुरन्स , वर्क मेन कॉम्पेसेशन पॉलीसी, व्यवसाय कर, टी.डी.एस. सानग्रह अनुदान, पगारी आठवडा सुट्या, जी.एस.टी, कामगार कायद्यानुसार वेतन स्लिप व इतर आर्थिक देणी देणेबाबतची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी निविदाधारकावर बंधनकारक राहील संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोषिस व झळ संस्थानला लागणार नाही हे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

२७) निविदाधारकास प्रत्येक औषध फवारणीचे वेळी विभाग प्रमुख सांगतील त्या अधिकारी / कर्मचारी यांचे समक्ष औषध फवारणी करुन दयावी लागेल.



Scanned with Oken Scanner

२८)निविदाधारकास संस्थानकडून किटकनाशक औषधे साहित्य ठेवणेकामी एक स्टोअर रुम निविदा कालावधीत मोफत देण्यात येईल.

२९)पेस्ट कंट्रोल करणेकामी देण्यात आलेल्या चौ.फु.दरामध्ये खोल्या, छत, भुभाग, चार भिंती त्यातील फर्निचर, संडास बाथरुम, गादया, कॉट, लॉकर्स, क्लोकरुम, हॉल, गॅलरी, साईड गटार, चेंबर्स इ.चा समावेश राहील. बील हे चटाई क्षेत्राचे मोजमापा प्रमाणे अदा केले जाईल.

३०)कार्यदेशात इमारतीव्यतिरीक्त पेस्ट कंट्रोल करावयाच्या इमारतीमध्ये वाढ झाल्यास, वाढीव इमारतीचे आकारमानानुसार प्रति चौरस फुटास मंजुर दराने व त्याच दराने वाढीव इमारतीमध्ये या करार कालावधीत पेस्ट कंट्रोल करुन देणे निविदाधारंकावर बंधनकारक राहील त्यासाठीचे अटी व शर्ती आहे त्याच राहतील ज्या वाढीव इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करावयाचे आहे त्या बाबत निविदाधारकास स्वतंत्र पत्र देऊन कळविण्यात येईल.

३१) एक वर्षाचे कालावधीमध्ये प्रति दोन महिन्यानंतर एक फवारणी अशा कमीतकमी सहा फवारण्या करणे आवश्यक आहे, अशा केलेल्या प्रत्येक फवारणी नंतर एकुण मंजुर रक्कमेच्या १० % एवढे किंवा झालेल्या कामाचे मंजुर दराने होणा-या रक्कमे इतके बील निविदाधारकाने संबंधित विभागाकडे सादर करावे. शिल्लक राहणारी रक्कम मुदती अखेर (कामाचे पुर्ततेनंतर) आदा केली जाईल.

३२) एक वर्ष करार कालावधीत कोणत्याही कारणांसाठी अथवा सबबीवर निविदाधारकास दरवाढ मिळणार नाही. निश्चित केलेल्या दरानेच पेस्ट कंट्रोल काम करावे लागेल

३३) नियुक्त केलेल्या कामगाराचे संबंधित कॉन्ट्रॅक्ट लेबर ( रेग्युलेशन अॅण्ड अॅबॅलिशन) अॅक्ट १९७० नुसार हजेरी रजिस्टर, वेतन पत्रके, वगैरे अनुषगिक कागदपत्रे विहित नमुन्यात ठेवणे तसेच सदरच्या कायदयानुसार त्यांची पुर्तता करणे ही संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३४)निविदाधारंकाकडुन नियुक्त केलेल्या कामगारानी साईभक्तांशी, नागरिकाशी, संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याशी गैरवर्तन करणार नाही, यांची काळजी निविदाधारंकाने घ्यावयाची आहे.

३५) निविदाधारकांस इमारतींच्या सभोवतालच्या परीसरात ड्रेनेज / चेबर्स या ठिकाणी औषध फवारणी करावी लागेल.

३६) निविदाधारकास पेस्ट कंट्रोल करतांना मधमाश्याचे मोहोळ आढळुन आल्यास ते काढावे लागेल.

३७)पेस्ट कंट्रोल करणेकामी Sub Contractor नेमता येणार नाही. कर्मचा-यांना आपले कंपनीचे गणवेश व सुरक्षतेबाबतचे साहित्य दयावे लागतील.

३८)पेस्ट कंट्रोल करणेकामी Central Insecticide Boards ने Aprrove केलेले (House Hold) (Aimco Pesticided Ltd, Bayer CropScience Ltd, Bharat Rasayan Ltd) औषध वापरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

३९) निविदाधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे नियमानुसार योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल व त्यास येणारा खर्च निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.

४०)उपरोक्त अटी-शर्तीपैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास निविदाधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा राहिल. संस्थानचे झालेली नुकसानीची, नुकसान भरपाई निविदाधारंकाकडुन वसुल करण्यात येईल.

४१)उपरोक्त अटी-शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी-शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी शर्ती विहित करणे याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे.

४२)Technical Document मधील पान नं.३ अं.नं.१ मध्ये नमुद केलेले तांत्रिक कागदपत्रे (Technical Bid) स्कॅन करुन online Upload करावेत.

४३) Nit Document व Technical Document हे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन Download करुन Nit Document मधील व Technical Document मध्ये आवश्यक ती माहिती भरुन त्यावर फर्मचा शिक्का व सही करुन online Upload करावेत.

४४)ई-निविदा सादर करण्यापुर्वी ज्या निविदाधारकांना कामाची माहिती घ्यावयाची असेल अशा निविदाधारकांनी ई-निविदा टेंडर सादर करण्या पुर्वी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमध्ये समक्ष जाऊन/कामाची पहाणी व सखोल अभ्यास करुन माहिती घेवून बीड ऑफ कोटेशन ( BOQ ) मध्ये सर्व कर वगळुन अंतिम दर दयावेत.

४५)बीड ऑफ कोटेशन ( BOQ ) अपलोड करतांना निविदाधारकांने फक्त मुळ रक्कम नमुद करावी. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार GST रक्कम संस्थानमार्फत देण्यात येईल. सदर GST ची रक्कम विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच शासनाकडे GST भरणा केलेबाबतचे चलन व बील निहाय गोषवारा तसेच फवारणी नंबर बीलासोबत संस्थानकडे सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. शासनाने वेळोवेळी करसंबधीत केलेले बदल निविदा धारकास लागु राहतील.

४६) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल व

४७) कोणतेही कारण न देता निविदेच्या कोणत्याही टप्यावर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार प्रशासनाने राखून ठेवला आहे.

४८) या कॉन्ट्रक्टबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो राहाता / कोपरगाव या कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

(राहुल जाधव)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.



Scanned with Oken Scanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी    साईबाबा भक्तनिवासस्थान

# Technical Document

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणे या कामाची निविदा.

सन २०२३-२०२४

( एक वर्षाकरीता )

दि.०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४/२०२४

Scanned with Oken Scanner

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या तिनही निवासस्थानांचे इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणे या कामाची निविदा.

**सन २०२३ - २०२४**

**दि.०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४/२०२४**

### ✡ निविदाधारकाची माहिती ✡

१) निविदाधारकाचे नाव - ------------------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता - ------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

३) फोन क्रमांक ऑफीस - ------------------------------
निवास - ------------------------------
फॅक्स नंबर - ------------------------------
ई – मेल - ------------------------------

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नाव - ------------------------------------------------
मोबाईल नंबर - ------------------------------

५) मालकाचे / भागीदाराचे नाव – १) ------------------------------------------------
२) ------------------------------------------------
३) ------------------------------------------------

६) औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर - ------------------------------

७) आयकर पॅन नंबर - ------------------------------

८) प्रॉव्हिडंड फंड कोड नंबर - ------------------------------

९) GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती ------------------------------

१०) बयाणा रक्कम शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती ------------------------------

११) निविदा किंमत शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती ------------------------------

दिनांक - / /२०२३
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

------------------------------------------------------------------------



कार्यालयीन कामकाजाकरीता

Scanned with Oken Scanner

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे पत्र

दिनांक - / /२०२३

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
ता- राहाता जि- अहमदनगर

**विषय- संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागामध्ये सन २०२३ -२४ साठी एक वर्ष कालावधी करीता (दि ०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४ /२०२४) इमारतीतील हॉल / रुममध्ये ढेकूण, झुरळे इ. किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) बाबतची ई निविदा.**

महोदय,

खालील सही करणार, मी /आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र राज्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली ई –निविदा वाचली. आपल्या ई- निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असुन सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. आम्हाला सेवा करण्यास स्वारस्य व आपल्या अटी- शर्ती पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेमध्ये नमुद केलेल्या संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीचे खोल्या / हॉलमध्ये किटकनाशक फवारणी, (पेस्ट कंट्रोल) करावयाचे आहे त्यासाठी लागणारे सर्व साहित्य / मशिनरी व उच्चतम दर्जाचे औषधे स्वतःच्या खर्चाने वापरावयाचे आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारणेची हमी देतो. त्यासाठी लागणा-या मशिनरी व कामगार यांची राहण्याची / जेवणाची / चहापानाची व्यवस्था मी / आम्ही आमचे खर्चाने करु , कामगारांचे वेतन / भविष्यनिर्वाह निधी / व्यवसाय कर / सेवाकर / आयकर वगैरे सर्व कायदेशीर जबाबदारी व त्याबाबत कराव्या लागणा-या पुर्ततेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर / आम्हावर राहील, याची हमी देत आहे/आहोत.

सदर पत्राव्दारे हमी देतो की, आम्हाला/आमच्या संस्थेला पेस्ट कंट्रोल कामी कुठल्याही शासकीय, निम शासकीय,सहकारी संस्थान अथवा खाजगी संस्थान यांनी काळ्या यादीत (Black Listed) टाकलेले नाही . सदर माहिती खरी व बरोबर असुन,ती चुकीची आढळल्यास आमची निविदा रद्द होणेस पात्र राहील.

निविदा फी व बयाणा रक्कम शासनाचे वेबसाईटवर www.mahatenders .gov.in ऑनलाईन ने भरलेची पावती सोबत जोडत आहोत.

माझी/आमची निविदा मंजुर झाल्यास सर्व अटी-शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करुन देणेस तयार आहे / आहोत त्यास नियमानुसार येणारा खर्च मी करेल/आम्ही करु. उपरोक्त कामाची हमी म्हणुन मंजुर झालेल्या रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन रोख / RTGS / NEFT ने व्दारे भरणा करु. निविदेतील मंजुर दराने काम करुन देणे माझेवर/ आम्हावर बंधनकारक राहील.

आपला / आपले विश्वासु
निविदाधारकांची सही

शिक्का

**निविदाधारकांचे नाव** - ----------------------------------------------------
----------------------------------------------------
**संपुर्ण पत्ता** ----------------------------------------------------
**फोन/ मोबाईल नंबर** ----------------------------------------------------



Scanned with Oken Scanner

१) खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांची ( Technical Bid) स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावेत.

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील | जोडले असल्यास ✓ मार्क करावे |
|---|---|---|
| १ | बयाना रक्कम रु. १६,००० /- शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती | |
| २ | ई – निविदा फी रु.३२००/- शासनाचे वेबसाईटवर भरलेची पावती | |
| ३ | आय.एस.ओ. (I.S.O.) मानांकन प्रमाणपत्र | |
| ४ | Licensing Authority चे प्रमाणपत्र | |
| ५ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला | |
| ६ | पॅन कार्ड | |
| ७ | प्रॉव्हिडंड फंड स्वतंत्र कोड नंबर ( कोड ड्रॉप्ट लेटर ) | |
| ८ | GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑन लाईन GST क्रमांक पावती | |
| ९ | शासकीय/निमशासकीय / पंचतारांकित हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेश. | |
| १० | पेस्ट कंट्रोल कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा व त्यासंदर्भातील आवश्यक पुरावे. | |
| ११ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटर ट्रेनिंगचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>१) Central Food Technological Resarch Institute अथवा<br>२) Technical Training For PMPs अथवा<br>३) Storage Pest Management & Fumigation<br>( भारतीय अनाज संचयन संस्थान चे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र ) अथवा<br>४) The Pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र. | |
| १२ | सन २०१९-२०२०, २०२०-२०२१, व २०२१-२०२२ तीन आर्थिक वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीचे चार्टड अकाऊंटंट यांचेकडील प्रमाणपत्र. | |
| १३ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले / असले बाबतचे हमीपत्र लेटर हेडवर सही शिक्यानिशी सादर करावे ( Self Declaration ) | |

निविदाधारकाची सही व शिक्का

( राहूल जाधव.)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.



Scanned with Oken Scanner

# Bid of Quotation (BOQ)

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणे या कामाची निविदा.**

**सन २०२३-२०२४**

**( एक वर्षाकरीता )**

**दि.०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४/२०२४**

Scanned with Oken Scanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी                    साईबाबा भक्तनिवासस्थान

# पेस्ट कंट्रोल निविदा तक्ता (किटकनाशक औषध फवारणी)

## कालावधी २०२३-२०२४

## दि. ०१/०५/२०२३ ते दि. ३०/०४/२०२४

निविदाधारकाने साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या इमारतीमध्ये खोल्या/हॉल (भुभाग,छत,भिंती) त्यातील फर्निचर, संडास, बाथरुम, गादया, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकुण, झुरळे इ.किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन पेस्ट कंट्रोल करणेकामी एक वर्षाकरीता (०६ फवारण्या) प्रति चौरस फुटाचा दर दयावा. इमारतींचे डग, ड्रेनेज, गॅलरी,पॅसेज इत्यादीचा समावेश त्यात राहील.

| अ.नं | तपशिल | पेस्ट कंट्रोल करणे तीनही निवासस्थानचे इमारतीमधील खोल्या, हॉल , टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण क्षेत्रफळ | एकुण फवारणीचा प्रति चौ. फुट वार्षिक दर ✡ Exclusive of All Taxes ✡ (सहा फवारणी ) रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवास<br>खोल्या - ५२६<br>हॉल - ११<br>लॉकर्स - १९८<br>१,७३,२६८.०० चौ.फुट | ४,६०,९९८.६६ चौ. फुट. | |
| २ | साईप्रसाद निवासस्थान<br>खोल्या - २१२<br>हॉल - २८<br>लॉकर - ९९<br>८२,६१३.६६ चौ.फुट | | |
| ३ | व्दारावती निवासस्थान<br>खोल्या - ३३०<br>२,०५,११७.०० चौ.फुट | | |

**Note :– Rate Of GST as applicable by Govt. time to time**

निविदाधारकाचे पूर्ण नाव -

शिक्का व संपूर्ण पत्ता -

मोबाईल नंबर -

निविदाधारकाची स्वाक्षरी-

(राहूल जाधव)

प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

Scanned with Oken Scanner